आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७,०० वाजता
१४ मे २०२५ -बुधवार

**ठळक बातम्या**

- मुंबई मेट्रोच्या कामापैकी ५० किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर ६२ किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आश्वासन

- गेल्या महिन्यात घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित महागाई दर घसरुन ८५ शतांश टक्क्यावर

- राज ठाकरे यांच्या प्रस्तावाला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा सकारात्मक प्रतिसाद

- भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी

**आणि**

- खेलो इंडियामधे १४१ पदकांसह महाराष्ट्र अव्व्लस्थानी कायम

<><><><><>

मुंबई मेट्रोच्या कामापैकी ५० किलोमीटरचे टप्पे या वर्षी, तर ६२ किलोमीटरचे टप्पे पुढच्या वर्षअखेरपर्यंत पूर्ण करू, असं आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज दिलं. फडनवीस यांच्या उपस्थितीत दहिसर ते काशीगाव या मेट्रोच्या टप्प्याची तांत्रिक तपासणी आज झाली, त्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. हा टप्पा प्रवाशांसाठी खुला झाल्यावर पश्चिम द्रुतगती मार्गावरची वाहतूक कोंडी कमी व्हायला मदत होईल, असं फडनवीस म्हणाले. विविध ठिकाणचे मेट्रो मार्ग एकमेकांशी जोडण्याचं कामही सुरू असून यामुळे मुंबई आणि मुंबई महानगर क्षेत्रात प्रवास करणं सोयीचं होईल, असंही त्यांनी सांगितलं. वाढवण बंदराजवळ बुलेट ट्रेनचं स्थानक असून त्याच्याशी मेट्रो जोडण्याची आखणीही सुरू असल्याची

माहिती त्यांनी दिली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.

<><><><>

घाऊक किंमत निर्देशांकावर आधारित भारताचा महागाई दर गेल्या महिन्यात कमी होऊन ८५ शतांश टक्क्यावर आल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं म्हटलं आहे. मार्च महिन्यात हा दर अडीच टक्के होता. खाद्यान्न, इंधन, दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किमती घटल्याने महागाई दरात घट झाली आहे.

खाद्यान्न निर्देशांकावर आधारित महागाई दर कमी होऊन २ पूर्णांक ५५ शतांश टक्के झाला आहे. गेल्यावर्षी तो ४ पूर्णांक ६६ शतांश टक्के इतका होता. अन्न उत्पादनाच्या किमतीत वाढ झाल्यामुळे महागाई दरात घट झाल्याचं मंत्रालयानं◌ं म्हटलं आहे. चालू आर्थिक वर्षात किरकोळ महागाई दर चार टक्क्याच्या आसपास राहील असा अंदाज रिझर्व्ह बँकेने वर्तवला होता, मात्र भाजीपाला, फळं, डाळी यांचे दर कमी झाल्याने एप्रिल महिन्यात किरकोळ महागाई दर ३ पूर्णांक १६ शतांश टक्क्यावर आला आहे. जुलै २०१९ नंतर हा सर्वात नीचांकी किरकोळ महागाई दर आहे.

<><><><>

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी दिलेल्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाबरोबर जाण्याच्या प्रस्तावाला आपल्या पक्षाचा सकारात्मक प्रतिसाद असून भविष्यातही राहील, असं शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत यांनी सांगितलं. नाशिक इथं आज ते वार्ताहरांशी बोलत होते. राज ठाकरे यांच्याबरोबर जाण्यासाठी महाराष्ट्रद्रोह करणाऱ्यांशी संबंध ठेवू नये एवढीच अट राहील असं सांगून ते म्हणाले, की राज ठाकरे यांच्यासाठी आपल्या पक्षाचे दरवाजे उघडे आहेत.

राज्यातल्या महानगरपालिका प्रशासकांच्या ताब्यात असल्याने स्थानिकांचे प्रश्न कायम आहेत, त्यामुळे लौकरात लौकर महानगरपालिका निवडणुका घेतल्या पाहिजेत असं ते म्हणाले.

**<><><><><>**

दक्षिण मुंबईतल्या ऑगस्ट क्रांती मैदानातून आज मुंबई भाजपाने तिरंगा यात्रा काढली. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यात सहभागी झाले होते. ऑपरेशन सिंदूरमुळे भारतीय सैन्याची शक्ती जगाला समजली, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. पहलगाममधे दहशतवाद्यांनी अतिशय निर्घृणपणे नागरिकांची हत्या केली. त्यामुळे दहशतवाद्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय सैन्याने ऑपरेशन सिंदूर राबवलं. यात दहशतवाद्यांचे ९ तळ उद्ध्वस्त करण्यात आले, असं मुख्यमंंत्र्यांनी सांगितलं.

पाकिस्तानने भारतावर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांचा हल्ला यशस्वी होऊ शकला नाही. भारताची संरक्षण प्रणाली इतकी मजबूत आहे की ती भेदण्याची क्षमता पाकिस्तानची नाही असं फडनवीस म्हणाले. ही तिरंगा यात्रा सैन्यदलाच्या शौर्याला अभिवादन करण्यासाठी आहे, असं त्यांनी सांगितलं.

**होल्ड बाईट - मुख्यमंत्री**

**<><><><><>**

राज्य सरकारने आज ब्लॅकस्टोन समूहाच्या एक्सएसआयओ लॉजिस्टिक्स पार्क्स आणि होरायझन इंडस्ट्रियल पार्क्स यांच्याशी एक महत्त्वपूर्ण सामंजस्य करार केला. या करारानुसार राज्यात दहाहून अधिक औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स पार्क उभारले जाणार आहेत. यासाठी नागपूर, मुंबई, चाकण, खंडवा, सिन्नर, पनवेल याठिकाणी ७९४ एकरपेक्षा जास्त जमीन अधिगृहित केली जाईल. या सर्व प्रकल्पांमधे ५ हजार १२७ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक केली जाणार आहे. या पार्कमुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे २७ हजार रोजगार निर्माण होणार आहेत.

हा करार जागतिक दर्जाचे पर्यावरणस्नेही औद्योगिक आणि लॉजिस्टिक्स हब तयार करण्याच्या दिशेनं टाकलेलं पाऊल आहे, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यावेळी म्हणाले.

<><><><><>

भारताचे ५२ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण रामकृष्ण गवई यांचा शपथविधी आज नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी त्यांना पदाची शपथ दिली.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, लोकसभेचे सभापती ओम बिरला, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, तसंच केंद्रीय मंत्रिमंडळाचे इतर सदस्य, आणि सर्वोच्च न्यायालयातले इतर न्यायाधीश या समारंभाला उपस्थित होते.

<><><><><>

छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आज त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसंच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती संभाजी महाराजांना वंदन केलं आहे.

शौर्य आणि पराक्रमाचे प्रतीक, हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती छत्रपती संभाजी राजे यांना जयंतीदिनी मानाचा मुजरा, अशा शब्दात फडनवीस यांनी संभाजी महाराजांना अभिवादन केलं आहे. यावेळी मंत्रालयातले अधिकारी, कर्मचारी यांनीही संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून अभिवादन केलं.

हिमालयाएवढे शौर्य असलेले महापराक्रमी छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीदिनी मानाचा मुजरा, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अभिवादन केलं आहे.

नवी दिल्लीत महाराष्ट्र सदनामध्ये तसंच, महाराष्ट्र परिचय केंद्रात आज संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं.

यावेळी उपस्थित कर्मचाऱ्यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन केलं.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात स्थापन झालेल्या छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राच्या माध्यमातून हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्यावर अभ्यासक्रम तयार करून नव्या पिढीसमोर त्यांचा जाज्वल्य इतिहास आणि शौर्यगाथा पोहोचवल्या  जाव्यात, असं आवाहन अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाचे अध्यक्ष  नरेंद्र पाटील यांनी केले.  छत्रपती संभाजी महाराज  जयंतीचं  औचित्य साधून विद्यापीठात स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्राचं  उद्घाटन  करताना ते बोलत होते.

नांदेड शहरात सांगवी बुद्रुक इथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या नियोजित पुतळ्याच्या ठिकाणी अभिवादन सोहळा आयोजित करण्यात आला होता.

**<><><><>**

पुरंदर किल्ल्यावरील माची आणि छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म झालेल्या वाड्यांच्या भिंतीची पुनर्बांधणी, संवर्धन आणि जतनाच्या अनुषंगानं लष्कराशी चर्चा करून सकारात्मक प्रयत्न करू, अशी ग्वाही सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी आज दिली. किल्ले पुरंदर इथं छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्याला शेलार आणि मराठी भाषा आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केलं, त्यानंतर शेलार बोलत होते. रत्नागिरी जिल्ह्यातील कसबा या गावात राज्य शासनाच्या वतीनं संभाजी महाराजांचं स्मारक उभारण्यात येईल, अशी घोषणा उद्योगमंत्री सामंत यांनी यावेळी केली. आमदार विजय शिवतारे यांनी पुरंदर तालुक्याला प्रचंड ऐतिहासिक वारसा असल्याचं सांगून, पुरंदर किल्ल्याचा विकास आराखडा व्हावा अशी मागणी केली.

**<><><><>**

खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत, आज महाराष्ट्राची एकूण पदक संख्या १४१ झाली आहे. सध्या ५४ सुवर्ण, ४३ रौप्य आणि ४४ कांस्य पदकं मिळवून महाराष्ट्र पदक तालिकेत अव्वल स्थानावर कायम आहे. २८ सुवर्ण आणि २२ रौप्य पदकांसह ९२ पदकं मिळवून हरयाणा दुसऱ्या तर राजस्थान ५२ पदकांसह तिसऱ्या स्थानावर आहे. कर्नाटकाकडेही ५२ पदकं असली तरी सुवर्ण पदकांची संख्या कमी असल्याने त्याला चौथ्या स्थानावर समाधान मानावं लागलं आहे. खेलो इंडिया स्पर्धेचा आज ११वा दिवस असून उद्या समारोप होईल.

<><><><><>

थायलंड इथे सुरु असलेल्या खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय बॅडमिंटनपटू आकर्षि कश्यप आणि उन्नती हुडा आज सकाळी उप उपांत्यपूर्व फेरीत पोहोचल्या. आकर्षि कश्यप हिने महिलांच्या एकेरी स्पर्धेत जपानच्या कावरु सुगियामा हिला नमवलं तर उन्नती हुडा हिने थायलंडच्या तामोनवान निथीटीकाराय हिला हरवलं. पुरुष एकेरीत भारताच्या लक्ष सेन ला पराभवाला सामोरं जावं लागलं.महिला दुहेरीत आज भारताच्या गायत्री गोपीचंद आणि ट्रेसा जॉली यांचा सामना मलेशियाच्या कार्मेन टिंग आणि ओंगक्षींयि यांच्याशी होईल.

<><><><><>

संघ लोक सेवा आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. अजय कुमार यांची नियुक्ती राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे. आस्थापना आणि प्रशिक्षण विभागानं जारी केलेल्या आदेशानुसार, अध्यक्षपदाचा कार्यभार स्वीकारल्यावर डॉ. कुमार यांचा कार्यकाळ सुरु होईल. डॉ. कुमार भारतीय प्रशासकीय सेवेतून निवृत्त झाले आहेत. ते १९८५ च्या तुकडीतले केरळ केडरचे अधिकारी असून त्यांनी यापूर्वी संरक्षण सचिव म्हणून काम पाहिलं आहे.

<><><><><>

येत्या दोन दिवसांत कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान शास्त्र विभागानं वर्तवली आहे. तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह विजांचा कडकडाट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची शक्यताही व्यक्त करण्यात आली आहे.

ठाणे , रायगड जिल्ह्यांसाठी 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे. इथे येत्या शुक्रवारपर्यंत गडगडाटासह विजा चमकण्याचा तसंच हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसासह वेगवान वारे वाहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

//<><><><><>//